नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १३७ | Issue - 137 | वार - सोमवार दि. १२ ऑक्टोबर २०२६ | Blow- Monday Date 12 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## शेतकरी-शेतमजुरांना रोजगार, अन्नधान्य, पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन यावर भर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत मुख्यमंत्र्यांची बैठक; तंत्रज्ञानाधारित दुष्काळी मदतीचे नियोजन याला प्राधान्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबतच्या बैठकीत दिली. केंद्रीय पथकाकडून दुष्काळी भागातील परिस्थितीबाबतचा अहवाल केंद्र शासनाला सादर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय पथकाने अत्यंत विस्तृत दौरा करून तळागाळापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले असल्याचे या वेळी केंद्रीय पथकाला सांगितले. केंद्रीय पथकाच्या संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. त्यामुळे सोयाबीन



पिकाला अनेक ठिकाणी सर्वाधिक झळ बसली. तर कापूस, तूर आणि ऊस ही पिकेही बाधित झाली आहेत. पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव राहिलेला नाही. खरीप हंगामातील नुकसान रब्बी किंवा उन्हाळी पिकातून भरून काढण्याची संधीही यंदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करून मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन

दुष्काळी परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांतील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. यापूर्वी २५ हजार गावांमध्ये राबविलेल्या कामांमुळे १५ ते १७ टक्के पाणी तूट असतानाही त्या भागांना दिलासा मिळाला. सॉफ्टवेअर आणि पच्या माध्यमातून अशा कामांची पारदर्शक अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

पशुधनासाठी चारा-पाण्याचे नियोजन

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विविध जिल्ह्यांत उपलब्ध चाऱ्याचा साठा ९० ते १२० दिवसांपर्यंतचा आहे. मातीमध्ये ओलावा असलेल्या पाणलोट क्षेत्रांत चारा उत्पादन वाढविण्यात येईल. उपलब्ध चारा शासनाने घोषित केलेल्या दराने खरेदी करून त्याच्या साठवणुकीची व्यवस्था केली जाईल. आवश्यकता भासल्यास चांगला पाऊस झालेल्या अन्य राज्यांतूनही चारा उपलब्ध करण्याचा विचार केला जाईल.

(पान २ वर....)

### पिण्याच्या पाण्याला प्राधान्य

**मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरांना काही दिवस झालेल्या पावसाचा लाभ झाला असला तरी उर्वरित महाराष्ट्रात, विशेषतः ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक गावापर्यंत पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा राज्य शासन तयार करीत आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले आहे. त्यात नागरिक आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची स्वतंत्र तरतूद केली असून त्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी उपलब्ध केले जाईल. या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.**

## आंदोलनामुळे मुंबईत वातावरण तापले, ठाकरेंचा रस्त्यावर ठिय्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईच्या दादर येथे शिवसेना भवन परिसरात सध्या वातावरण प्रचंड तापले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे आणि त्यांचे बंधू तेजस ठाकरे रस्त्यावर उतरले आहेत. ठाकरे बंधूंनी रस्त्यावर ठिय्या मांडला. यावेळी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. शेकडो शिवसैनिक परिसरात दाखल झाले आहेत. स्थानिक ठाकरे गटाचे आमदार महेश सावंत हे देखील बऱ्याच वेळापासून शिवसेना भवन परिसरात उपस्थित आहेत.

सीजेपीकडून शिवाजी पार्क परिसरात आंदोलनाची हाक देण्यात आली होती. या आंदोलनासाठी आंदोलक आले असता पोलिसांनी त्यांची धरपकड केली. याचवेळी शिवसेना भवन परिसरात उपस्थित आमदार महेश सावंत आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यानंतर आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे तिथे दाखल झाले. दुसरीकडे मनसे नेते अमित ठाकरे हे शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गेले आहेत. कॉक्रोच जनता पार्टीकडून मुंबईच्या दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क (शिवाजी पार्क) येथे आंदोलनाची हाक देण्यात आली. रविवारी संध्याकाळी चार वाजता शिवाजी पार्क मैदानात आंदोलन आयोजित करण्यात आलं. पण या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा फौजफाटा शिवाजी पार्क मैदानात तैनात होता. शिवसेना भवन समोर शिवाजी पार्क मैदानाकडे जाणाऱ्या रस्ता पोलिसांनी अडवला आहे.

तसेच शिवाजी पार्कच्या दिशेला जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर बॅरिकेट्स लावून पोलीस फौजफाटा तैनात आहे. तरीही आंदोलकांनी हार न मानता शिवाजी पार्क मैदानाच्या दिशेला जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांकडून आंदोलकांची धरपकड करण्यात आली.

आंदोलकांमध्ये तरुण मुलं आणि मुलींचा समावेश आहे. आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सर्व आंदोलकांना पोलीस ताब्यात घेत आहेत. या दरम्यान काही आंदोलक तरुणींनी जमिनीवर ठिय्या मांडला.

या आंदोलक तरुणींना महिला पोलिसांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण आंदोलक तरुणीदेखील चिवटपणे पोलिसांचा प्रतिकार करताना दिसल्या. महिला पोलिसांकडून एकेक महिला कार्यकर्त्याला फरफटत नेत पोलीस व्हॅनमध्ये बसवण्यात आलं. एकीकडे सीजेपीच्या आंदोलकांची धरपकड केली जात असताना शिवसेना भवन परिसरात वातावरण तापताना बघायला मिळालं.

शिवसेना भवन परिसरात ठाकरे गटाचे आमदार महेश सावंत याआधीच उपस्थित होते. तसेच दुसरीकडे मनसे नेते संदीप देशपांडे आणि मनसे नेते अमित ठाकरे हे देखील उपस्थित होते. पोलिसांकडून केल्या जात असणाऱ्या कारवाईचा जाब विचारण्यासाठी अमित ठाकरे शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गेले. तर दुसरीकडे शिवसेना भवन परिसरात ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि पोलीस समोरासमोर आले.

याचवेळी आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे तिथे उपस्थित झाले. त्यांनी तिथेच रस्त्यावर ठिय्या मांडला. यामुळे वातावरण तापलं. सध्या परिसरात ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांकडून ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली जात आहे.

## एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार चौकशी होईपर्यंत रजेवर जाणार, विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरु असलेलं एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन अखेर मागे घेण्यात आलं आहे. मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी येत शासनाची बाजू मांडली. यानंतर दोन्ही बाजूने चर्चा झाली. विद्यार्थी एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्यावर ठाम राहिले. अखेर आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या समाविष्ट असलेल्या चौकशी समितीकडून पेपरफुटी प्रकरणाची चौकशी होईपर्यंत सध्याचे एमपीएससी अध्यक्ष पदापासून दूर राहतील, अशी अट विद्यार्थ्यांनी ठेवली. या अटीवर मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुख्यमंत्र्यांसोबत बातचित केली. त्यानंतर राज्य सरकारला १० मिनिटांचा वेळ देण्यात आला. या दहा मिनिटांत एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी आपण चौकशी होईपर्यंत रजेवर जाणार असल्याचं ट्विट केलं. यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली.

विद्यार्थ्यांच्या शिफारसीनुसार, पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारकडून समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांचा समावेश करण्यात आला आहे. तुकाराम मुंढे यांना समितीत सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. तसेच या समितीची चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससीचे विद्यमान अध्यक्ष विवेक भीमानवार विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, पदापासून दूर राहणार आहेत. विवेक भीमनवार यांनी स्वत: ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे.

एमपीएससी पेपरफूट प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीची घोषणा केली आहे. मी माझ्या संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला कायम प्राधान्य दिले. त्यामुळे ही चौकशी पूर्ण होईस्तोवर पदावर कार्यरत न राहता या कालावधीत रजेवर जाण्याचा निर्णय मी घेतला आहे. एमपीएससीची स्वायत्तता, विश्वसनीयता आणि विद्यार्थीहिताला कायम माझे प्राधान्य होते आणि यापुढेही असेल. जयहिंद ! जय महाराष्ट्र, असं विवेक भीमनवार ट्विटमध्ये म्हणाले.

पुण्यात एस. एम. जोशी पुलाजवळ गेल्या १० दिवसांपासून एमपीएससी विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होतं. राज्य सरकारने या आंदोलनाची दखल घेत मंत्री शिवेंद्रराजे भोसले सरकारच्या बाजूने आंदोलकांच्या भेटीला गेले. आधी रोहित पवार आणि शिवेंद्रराजे भोसले यांच्यात चर्चा झाली. यानंतर आंदोलनस्थळी राज्य सरकारचा मसुदा घेऊन शिवेंद्रराजे भोसले पोहोचले. यावेळी शिवेंद्रराजे भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदा सांगितला. पण यानंतरही विद्यार्थी आंदोलन मागे घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे जवळपास दोन तास प्रचंड गोंधळ बघायला मिळाला.

आंदोलन मागे घेण्यासाठी रोहित पवार यांना विद्यार्थ्यांनी अडवलं होतं. अखेर प्रचंड गोंधळानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं. सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर रोहित पवार आंदोलन मागे घेण्यास तयार होते. मात्र विद्यार्थी काही ऐकण्याच्या तयारीत नव्हते. रोहित पवारांना आपला मुद्दा पटवून देण्यात तब्बल दीड ते दोन तास प्रयत्नाची पराकाष्टा करावी लागली. रोहित पावरांच्या भाषणात विद्यार्थ्यांनी प्रचंड गोंधळ घालत अनेक वेळा त्यांचं भाषण बंद पाडले. रोहित पवार हे ११ दिवस फुटपाथवर झोपले असे पवारांचे कार्यकर्ते वारंवार सांगत असताना देखील विद्यार्थी ऐकत नव्हते. या सगळ्यादरम्यान विश्वजीत कदम यांनी दिल्लीतील आंदोलनात जायचे कारण देऊन काढता पाय घेतला. अखेर विवेक भीमनवार यांच्या रजेवर जाणार असल्याच्या (पान २ वर...)

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ५ कोटींचे बक्षीस

## आडाचीवाडी ग्रामपंचायत ठरली महाराष्ट्रात सर्वोत्तम!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकसहभागाच्या जोरावर ग्रामसमृद्धीचा नवा आदर्श घालत पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६' मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. नाशिक येथे पार पडलेल्या एका शानदार आणि भव्य सोहळ्यात हा बहुमान प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आडाचीवाडी ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला. यासह 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.०, २०२६-२७' चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री गिरीष महाजन, मंत्री दादाजी भुसे, मंत्री नरहरी झिरवाळ, पद्मश्री पोपटराव पवार



आणि इतर आमदार व मान्यवर उपस्थित होते. आडाचीवाडी ग्रामपंचायतीने मिळविलेला हा राज्यस्तरीय बहुमान ग्रामीण महाराष्ट्रातील इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याला कारणंही तसंच आहे. गावाने केवळ पुरस्कारच जिंकला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्रासमोर विकासाचा एक आदर्श मॉडेल उभे केले आहे.

लोकसहभाग आणि अचूक नियोजनातून आडाचीवाडीची गरुडझेप

आडाचीवाडी ग्रामपंचायतीने १०० टक्के कर वसुली, पाण्याचे चोख नियोजन व व्यवस्थापन, आणि गावकऱ्यांच्या साथीने राबवलेली विकासकामे या जोरावर राज्यासमोर ग्रामविकासाचा एक नवा वस्तुपाठ ठेवला आहे. गावाच्या याच उल्लेखनीय आणि आदर्श कामगिरीची दखल घेत ग्रामपंचायतीला ५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस आणि मानाचे प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

आडाचीवाडीने दाखवला ग्राम विकासाचा आदर्श

आडाचीवाडी ग्रामपंचायतीच्या या यशामागे ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, उपलब्ध साधनांचा योग्य वापर, पाण्याचे चोख नियोजन आणि प्रशासकीय शिस्त यांचे मोलाचे योगदान आहे. लोकांच्या एकजुटीतून गावाचा कायापालट कसा होऊ शकतो, हेच आडाचीवाडीने संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आडाचीवाडीच्या सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि संपूर्ण गावकऱ्यांचे जाहीर अभिनंदन केले आहे.

## संपादकीय....

### अखेर आंदोलन मागे

आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरु असलेलं एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन अखेर मागे घेण्यात आलं आहे. मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी येत शासनाची बाजू मांडली. यानंतर दोन्ही बाजूने चर्चा झाली. विद्यार्थी एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्यावर ठाम राहिले. अखेर आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या समाविष्ट असलेल्या चौकशी समितीकडून पेपरफुटी प्रकरणाची चौकशी होईपर्यंत सध्याचे एमपीएससी अध्यक्ष पदापासून दूर राहतील, अशी अट विद्यार्थ्यांनी ठेवली. या अटीवर मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुख्यमंत्र्यांसोबत बातचित केली. त्यानंतर राज्य सरकारला १० मिनिटांचा वेळ देण्यात आला. या दहा मिनिटांत एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी आपण चौकशी होईपर्यंत रजेवर जाणार असल्याचं ट्विट केलं. यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांच्या शिफारसीनुसार, पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारकडून समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांचा समावेश करण्यात आला आहे. तुकाराम मुंढे यांना समितीत सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. तसेच या समितीची चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससीचे विद्यमान अध्यक्ष विवेक भीमानवार विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, पदापासून दूर राहणार आहेत. विवेक भीमनवार यांनी स्वतः ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. एमपीएससी पेपरफुट प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीची घोषणा केली आहे. पुण्यात एस. एम. जोशी पुलाजवळ गेल्या १० दिवसांपासून एमपीएससी विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होतं. राज्य सरकारने या आंदोलनाची दखल घेत मंत्री शिवेंद्रराजे भोसले सरकारच्या बाजूने आंदोलकांच्या भेटीला गेले. आधी रोहित पवार आणि शिवेंद्रराजे भोसले यांच्यात चर्चा झाली. यानंतर आंदोलनस्थळी राज्य सरकारचा मसुदा घेऊन शिवेंद्रराजे भोसले पोहोचले. यावेळी शिवेंद्रराजे भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदा सांगितला.

# कुंभमेळा विकासकामांमुळे नाशिक-त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विविध विकासकामांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पाहणी; कामे निर्धारित वेळेत गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना

नाशिक : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात सुरू असलेली विविध विकासकामे वेगाने पूर्णत्वाकडे जात असून, या कामांमुळे नाशिक व त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून आधुनिक पायाभूत सुविधा निमर्ण करण्याबरोबरच भाविक, पर्यटक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेली सर्व कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या ध्वजारोहण संमारंभाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी आज त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट तसेच नाशिक येथील द्वारका सर्कल तसेच ओझर विमानतळ येथे भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती घेतली. यावेळी कामांची गती वाढवून ती वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री गिरीश महाजन, जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव तथा पालक सचिव एकनाथ डवले, आमदार हिरामण खोसकर, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. एस. व्ही. स्वामी, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, एमएसआयडीसीचे अधिकारी ब्रिजेश दीक्षित उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, तहसीलदार गणेश जाधव, मुख्याधिकारी गोविंद जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने सुरू असलेली कामे केवळ कुंभमेळ्यापुरती मर्यादित नसून, पुढील २५ ते ३० वर्षांसाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाचा पाया मजबूत करणारी आहेत. आधुनिक शहराच्या दिशेने वाटचाल करताना वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा, भाविक व पर्यटकांसाठी सुविधा तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ही कामे परिवर्तनात्मक ठरणार आहेत. पुढील टप्प्यात विमानतळाशी



संबंधित विकासकामांनाही गती मिळणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभाग आणि यंत्रणा समन्वयाने काम करीत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

महानगरपालिका, एमएसआरडीसी, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच विविध संबंधित विभागांच्या समन्वयातून ही कामे सुरू आहेत. पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा समन्वय तसेच सर्व यंत्रणांची एकत्रित टीम म्हणून सुरू असलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. या विकासकामांना गती देणाऱ्या सर्व यंत्रणांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले. विशेषतः एमएसआरडीसीने हाती घेतलेल्या महत्त्वपूर्ण कामांचे त्यांनी कौतुक केले.

त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट परिसरातील कामे आव्हानात्मक असली तरी ती नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, परिसराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत. देशभरातून येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने त्र्यंबकेश्वरचे महत्त्व अधिक व्यापक करण्यासाठीही या कामांचा उपयोग होणार आहे.

नाशिक येथील द्वारका सर्कलचे काम अत्यंत महत्त्वाचे आणि आव्हानात्मक आहे. मात्र, हे काम नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने सुरू असून निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यंदाच्या पावसाळ्यात या ठिकाणी पाणी निचऱ्याची चाचणी करण्यात आली असून, पावसाचे पाणी साचणार नाही आणि निचरा सुरळीत होईल, यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यानंतर त्यांनी ओझर विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामाचीही पाहणी केली. सिंहस्थ कुंभमेळानिमित्त नाशिकला येणारे भाविक व पर्यटक यांना आवश्यक व पायाभूत सेवा-सुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी आमदार प्रा देवयानी फरांदे, ड. राहुल ढिकले, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, एमएसआयडीसीचे अधिकारी ब्रिजेश दीक्षित, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार चौकशी होईपर्यंत रजेवर जाणार, विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे

(पान १ वरून..)

ट्विटनंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या मसुद्यात एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी आणि एमपीएससीमधील सुधारण्यासाठी चौकशी समितीची निर्मिती करण्यात आल्याचं राज्य शासनाच्या मसुद्यात होतं. या समितीत तुकाराम मुंढे, बी.डी नाईक, गणेश पाटील या प्रशासकीय अधिकाऱ्यांना समाविष्ट करण्यात आलं. तर लखमी गौतम या पोलीस अधिकाऱ्यांना सहभागी केलं. तसेच उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिलीप भोसले यांचं देखील नाव चौकशी समितीत घेतलं. ही समिती पेपरफुटी प्रकरणी चौकशी करणार आहे.

सरकारने विद्यार्थ्यांची आणखी एको मोठी मागणी मान्य केली आहे. राज्य सरकार पुढील ३ वर्षात ७० हजार जागा असे रिक्त सर्व पदे भरणार असल्याची घोषणा केली आहे. यासोबत २०२७ मध्ये होणाऱ्या गट क परीक्षेच्या पदांमध्ये दुप्पटीने वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## 'आम्हाला असा भारत नको..' इंडियाचा आघाडीचा अभूतपूर्व निर्णय, थेट सुप्रीम कोर्टावर मोर्चा धडकणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाच्या इतिहासामध्ये बहुदा पहिल्यांदा थेट सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा धडकणार आहे. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधामध्ये देशामध्ये रणकंदन सुरु असतानाच इंडिया आघाडीने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज ट्विट करत या संदर्भामध्ये भूमिका स्पष्ट केली आहे. हा मोर्चा राजकीय पक्षांचा नसून एक भारतीय म्हणून आपण सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणार असून सरन्यायाधीशांना निवेदन देणार असल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. या मोर्चामध्ये आपण पक्ष, लिंग, जात, समुदाय आणि राज्यांच्या भिंती ओलांडून एकत्रित मोर्चा काढणार आहोत. देशातील तरुण, सर्व विरोध पक्ष, नागरी समाज आणि लोकशाहीवरती विश्वास ठेवणारे व भारताच्या संविधानाशी पाठीशी उभे राहणारे सर्वजण आमच्या सामील होतील, असा विश्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.

मतचोरी थांबवा, एसआयआर बंदी, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी या संदर्भामध्ये देशाच्या सरन्यायाधीशांना निवेदन सादर करणार असल्याचं म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी आपल्या व्हिडिओमध्ये म्हटलं आहे की, नरेंद्र मोदी, अमित शहा, अजय डोवाल, मोहन भागवत भारताचा आवाज दाबू शकत नाही. हे डरपोक आम्हाला घाबरू शकत नाही. त्यांना माघार घ्यावीच लागेल. आम्ही सर्वजण प्रेम, बंधुभाव आणि देशभक्तीने एकत्र मोर्चा काढू. घाबरू नका उद्या संपूर्ण भारत सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा काढेल अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली.

राहुल गांधी यांनी म्हटलं आहे की, देशातील तरुण दिल्ली शांततापूर्ण आंदोलनासाठी रस्त्यावर उतरला आहे. त्यांची हृदये प्रेमाने भरलेली होती. द्वेष किंवा रागाने नव्हती, पण त्यांना पोलिसांनी आणि भाजपच्या गुंडांनी मारहाण केली. आम्हाला असा भारत नको आहे, त्यामुळे सोमवारी १२ ऑक्टोबर रोजी आम्ही भारतीय म्हणून सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा काढणार आहोत. यामध्ये पक्ष, लिंग, जात, समुदाय आणि राज्यांच्या भिंती ओलांडून आम्ही एकत्रित मोर्चा काढू, असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता ज्ञानेश कुमार यांच्या विरोधामध्ये देशामध्ये उद्रेक झाला असतानाच आता उद्याच्या मोर्चानंतर विरोधी पक्षांनी सुद्धा आरपारच्या लढाईचं रणशिंग फुंकल्याचं स्पष्ट झालं आहे.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन**

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पहिल्या पर्वातील पुरस्कारांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण**

# अभियानात दुष्काळ निवारणासाठी गावागावांत जलसंधारणाची कामे हाती घ्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० पाण्याचा प्रत्येक थेंब साठविणे, तलावांतील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या कामांसाठी राज्य शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्यावतीने आयोजित 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान लोकप्रतिनिधींचा महाकुंभ', मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा, अभियान २०२६-२७ चा शुभारंभ तसेच 'सरपंच परिसंवाद - दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

यूथ फेस्टिव्हल मैदानावर आयोजित या कार्यक्रमास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि राज्यभरातील सरपंच उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामीण भागातील सामूहिक शक्तीला चालना देऊन गावांच्या विकासाला गती देणारे महत्त्वपूर्ण अभियान आहे. लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास ग्रामीण भागात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते, हे जलयुक्त शिवार अभियानाने सिद्ध केले आहे. याच अनुभवातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

अभियानात सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थांचे त्यांनी अभिनंदन करून ते म्हणाले, गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अभियानामुळे गावांमध्ये रस्ते, स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही यंत्रणा, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे. पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींसह अंतिम १२ ग्रामपंचायतींना स्वतः भेट देऊन तेथील विकासकामांची पाहणी करणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

**दुष्काळाचा सामना करण्यासाठी पाण्याचे नियोजन करा**

यंदा सुरुवातीला अतिवृष्टी आणि त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाने दुष्काळ असलेल्या तालुक्यात १२




प्रकारच्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. आगामी काळात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असून, शेतकऱ्यांना मदत देताना आवश्यकतेनुसार निकषांच्या पलीकडे जाऊन निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. माणसे आणि जनावरांसाठी पाणी राखून ठेवण्याला प्राधान्य देऊन रब्बी हंगामासाठी योग्य नियोजन करावे. गाव तलावांमधील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे, जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे आणि जलतारा संरचना मोठ्या प्रमाणात उभारणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी अडवून जमिनीत जिरविण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा. या कामांसाठी शासनाकडून आवश्यक सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

जी रामजी योजनेच्या माध्यमातून विविध योजनांचे अभिसरण करून जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येतील. यामुळे पाणीसाठा वाढण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल. दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांनी आपले पशुधन विकू नये, यासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्याचे नियोजनही शासन करणार आहे. पशुधनाचे संरक्षण करणे हे शेतीव्यवस्था टिकविण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले.

**संकटाच्या काळात शासन शेतकरी व कष्टकऱ्यांच्या पाठीशी**

दुष्काळी परिस्थितीत कोणताही नागरिक उपाशी राहणार नाही, याची काळजी शासन घेईल. पात्र शिधापत्रिकाधारकांना आवश्यक अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासह शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचविण्यात येतील. शेतकऱ्यांना मदत करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणे आणि संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी उभे राहणे ही शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात दुष्काळ निवारण आणि दुष्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. तलावांतील गाळ काढणे, जलसंधारणाची कामे करणे आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा. या कामांना प्रोत्साहन देण्यासाठी अभियानाच्या गुणांकन पद्धतीतही आवश्यक बाबींचा समावेश करण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**अभियानातून ग्रामीण विकासाला चालना - मंत्री जयकुमार गोरे**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गावे समृद्ध झाली तर विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यास मोठे पाठबळ मिळेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील ५ हजार ६४४ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला. अभियानाच्या माध्यमातून ६९ लाख १३ हजार आयुष्मान कार्ड तयार करण्यात आली. विविध योजनांच्या अभिसरणातून घरकुलांचे लाभ, दिव्यांग लाभार्थ्यांना मदत, सीसीटीव्ही यंत्रणा, रस्ते, स्वच्छतागृहे, व्यायाम शाळा आणि जलपुनर्भरणाची कामे करण्यात आली.

राज्यात २ हजार ७०६ किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली असून पाणंद रस्ते, सौरऊर्जेचा वापर, घरपट्टी व पाणीपट्टी वसुली आणि ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढविण्यावरही भर देण्यात आला. गावांचे सक्षमीकरण करून त्यांना स्वयंपूर्ण व समृद्ध बनविण्यासाठी अभियानाचा दुसरा टप्पाही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा गौरव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायतींच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. गुणानुक्रमे जिल्हा परिषद गटात नाशिक, पुणे आणि सांगली; तर पंचायत समिती गटात नाशिक, खालापूर (जि. रायगड) आणि राहाता (जि. अहिल्यानगर) या समित्यांचा प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्काराने गौरव करण्यात आला.

ग्रामपंचायतींमध्ये पुणे जिल्ह्यातील अडाचीवाडी ता. पुरंदर प्रथम, खामशेत, ता. गुहागर, जि . रत्नागिरी आणि लाडूद, ता. बागलाण, जि. नाशिक (द्वितीय विभागून), उटी बु. ता. औसा, जिल्हा लातूर, कोतवालबर्डी, जिल्हा नागपूर (तृतीय विभागून) या ग्रामपंचायतींच्या पदाधिकाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला.

ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील कामांची माहिती दिली. सुशासन, कार्यक्षमता, लोकसहभाग, सामाजिक सलोखा आणि पर्यावरणपूरक विकासाला प्रोत्साहन देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील सुमारे २८ हजार ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदवून पंचायत प्रगती निर्देशांक उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जलतारा तज्ज्ञ प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ आणि ज्येष्ठ जलसंधारण कार्यकर्ते पद्मश्री पोपटराव पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अभियानाच्या पहिला टप्पा प्रभाविपणे राबविण्यात महत्वाच्या योगदानासाठी प्रधान सचिव एकनाथ डवले आणि यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास आमदार गोकुळ गीते, प्रा. देवयानी फरांदे, दिलीप बनकर, डॉ. राहूल आहेर, ड. राहूल ढिकले, हिरामण खोसकर, दिलीप बोरसे, सरोज अहिरे, नितीन पवार, विवेक कोल्हे, उपमहापौर विलास शिंदे, यशदाचे उपसंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी प्रतिभा संगमनेरे यांच्यासह राज्याच्या विविध भागांतून आलेले सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामविकास विभागाचे अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महावितरणच्या तारांमधून शॉर्टसर्किट; शिरवळवाडी येथील महिला शेतकऱ्याचा २.२५ एकर ऊस जळून खाक!

## नुकसानभरपाईसाठी ग्रामस्थांचे रस्ता आंदोलन; पंचनामा करून तातडीने भरपाई देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरवळवाडी /प्रतिनिधी – महावितरणच्या विद्युत तारांमधून झालेल्या शॉर्टसर्किटमुळे शिरवळवाडी येथील महिला शेतकरी लक्ष्मीबाई मल्लिकार्जुन मारलभावी यांच्या गट क्रमांक ७३/२/अ मधील तब्बल २.२५ एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे संबंधित शेतकरी कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, आधीच शेतीतील विविध अडचणींना सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे.

महावितरणच्या विद्युत तारांमधून शॉर्टसर्किट झाल्याने उसाला आग लागल्याचा आरोप करण्यात येत आहे. आगीमध्ये उभ्या उसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरवला गेला आहे. ऊस लागवड, खते, औषधे, पाणी आणि मशागतीसाठी केलेला खर्च वाया गेल्याने नुकसानग्रस्त महिला शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत.

### दुर्घटनेचे संभाव्य कारण हे

**वागदरी ॲग्रीकल्चर फीडरची ११ केव्ही उच्चदाब विद्युत वाहिनी टी–आकाराच्या रचनेत बसविण्यात आलेली असून, त्या ठिकाणी कट पॉइंट आहे. दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी अंदाजे ३:४५ वाजता कट पॉइंटवरील जंप जळाला. त्यामुळे विद्युत ठिणग्या पडून शेतातील अंदाजे २ एकर ऊस पिकाला आग लागून नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.**

**– कनिष्ठ अभियंता, वागदरी विभाग**

**दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी अंदाजे ३:४५ वाजता, माझ्या शेताजवळून गेलेल्या महावितरणच्या ११ केव्ही वागदरी ॲग्रीकल्चर फीडरवरील विद्युत वाहिनीच्या कट पॉइंटजवळील जंप जळून ठिणग्या पडल्यामुळे माझ्या शेतातील अंदाजे २ एकर ऊस पिकाला आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**

**– लक्ष्मीबाई मल्लिकार्जुन मारलभावी**

**पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी**

या घटनेची तातडीने दखल घेऊन जळालेल्या उसाचा अधिकृत पंचनामा करण्यात यावा, नुकसानीचे योग्य मूल्यमापन करावे आणि महावितरणकडून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत तातडीने कार्यवाही व्हावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी रस्ता आंदोलन केले.





**शेतकऱ्यांवर दुहेरी संकट**

एकीकडे शेतीचा वाढता खर्च आणि दुसरीकडे नैसर्गिक व इतर संकटांमुळे शेतकरी अडचणीत असताना, विद्युत तारांमुळे लागलेल्या आगीत ऊस जळाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यामुळे दुष्काळात तेरावा महिना अशी परिस्थिती लक्ष्मीबाई मारलभावी यांच्यावर ओढवली आहे.

संबंधित विभागाने घटनेची तातडीने चौकशी करून पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त महिला शेतकऱ्याला नियमानुसार योग्य नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी शिरवळवाडी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

प्रशासन आणि महावितरण या प्रकरणाची किती लवकर दखल घेते आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळतो का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

---

# डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीत एकदिवसीय बांबू हस्तकला कार्यशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने स्वेरीमध्ये रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय बांबू हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ०५ या वेळेत होतकरू महिलांनी सहभाग घेऊन आपल्या कलागुणांना वाव दिला. या कार्यशाळेच्या माध्यमातून होतकरू महिलांना एक प्रकारचे व्यासपीठ मिळाले असून रोजगार निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे महिला वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा यांच्या नेतृत्वाखाली एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर मध्ये आयोजिलेल्या कार्यशाळेसाठी मॅग्निफिसीन्स टोटल गिफ्टिंग सोल्युशन्स एलएलपीच्या संचालिका सौ. रश्मी पोंसे व त्यांच्या टीमने सहभागी महिला प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी सहभागी ५० महिलांना बांबूपासून आकर्षक भेटवस्तू तसेच दैनंदिन वापरातील विविध उपयुक्त वस्तू तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. पारंपरिक हस्तकलेला आधुनिक बाजारपेठेची जोड देत त्यातून उत्पन्नाच्या संधी कशा निर्माण करता येतील, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी महिला प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या बांगड्यांचा स्टँड आणि टी-लाईट होल्डर मॅग्निफिसीन्स टोटल गिफ्टिंग सोल्युशन्स एलएलपी यांनी विकतही घेतले. यामुळे महिलांची प्रशिक्षणामधेच विक्री करून व्यवसायाला सुरुवात ही झाली ही एक मोठी अभिमानास्पद बाब होती.

**महिलांसाठी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरचा उपक्रम**

कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा यांनी उपस्थित महिला प्रशिक्षणार्थीं बरोबर संवाद साधत मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या पारंपरिक कौशल्यांचा विकास करून त्यांना व्यावसायिक स्वरूप देण्यासोबतच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर सौ. रश्मी पोंसे व टीमनी बांबूपासून वस्तू तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत बांगड्यांचा स्टँड, टी-लाईट होल्डर आणि कंदील या वस्तू स्वतः तयार केल्या. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना बांबू हस्तकलेचे कौशल्य प्रत्यक्ष कृतीतून आत्मसात करण्याची संधी मिळाली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे समुदाय संपर्क व्यवस्थापक मधुकर पकाले यांनी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर द्वारे भविष्यात घेण्यात येणाऱ्या विविध कौशल्यविकास, उद्योजकता व रोजगाराभिमुख प्रशिक्षण उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. महिलांच्या कौशल्यांना व्यावसायिक दिशा देत त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि उद्योजक बनविण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली. अशा उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवरील पारंपरिक कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच महिलांसाठी नव्या स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. या कार्यशाळेत पंढरपूर पंचक्रोशीतील जवळपास ५० महिला सहभागी झाल्या होत्या. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर मधील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भैरवनाथ शुगरची गाळप हंगामासाठी सज्जता; तीन लाख टनाचे उद्दिष्ट!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – नोंदी केलेल्या सर्व ऊस वेळेत गाळापासाठी आणणार असल्याचे मार्गदर्शक शिवाजीराव सावंत यांची ग्वाही,

तालुक्यातील लवंगी येथील युनिट तीन तेराव्या गळीभंगामाचा बॉयलर अग्निप्रतीपदं व मोळी पूजनाचा उत्साहात पार पडला, दुष्काळ परिस्थितीमुळे यंदा उसाचे क्षेत्र कमी असतानाही नोंद केलेला सर्व वेळेत गाळापासाठी आणण्याचा निर्धार व्यवस्थापनाने व्यक्त केला, एकदा तीन लाख टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

ैरवनाथ शुगर चे मार्गदर्शक शिवाजीराव सावंत यांच्या शुभहस्ते बॉयलर अग्निप्रतीपण व मोळी पूजनाचा कार्यक्रम चेअरमन अनिल सावंत, व्हॉइस चेअरमन विक्रांत सावंत, यांच्या हस्ते गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला, प्रारंभी सुभाष जाधव व अरुणा जाधव, यांच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा सुरेश कांबळे व नाता काशीद यांच्या हस्ते

**लवंगीतील भैरवनाथ शुगर युनिट ०३ च्या तेराव्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन मोळी पूजन सोहळा उत्साहात संपन्न**

काटा पूजन करण्यात आले, उसाने भरलेल्या वाहनाची पूजन श्रीमती माने, चंद्र प्रभा माने यांच्या हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले.

दुष्काळामुळे उसाची उपलब्धता कमी असली तरी नोंद केलेला ऊस सर्व गाळापासाठी आणला जाईल, अशी ग्वाही शिवाजीराव सावंत यांनी दिली. तीन लाख मीटरिंग टनाचे उद्दिष्ट गाळपास दिले असून, ते पूर्ण करण्यासाठी कारखाना प्रशासन प्रयत्नशील असल्याचे चेअरमन अनिल सावंत यांनी सांगितले.

कार्यक्रमाला रतनचंद बँकेचे चेअरमन राहुल शहा, किसन गवळी, विक्रम सावंत सुरेश कांबळे, अप्पासाहेब माने सुधीर धुमाळ ,दौलत माने, प्रत्येक किल्लेदार प्रशांत शिंदे, बंडू जाधव, जमीर इनामदार, नाथा काशीद, श्याम गोगाव सर, संदीप तापडिया ,समाधान जाधव, तानाजी चव्हाण चंद्रकांत देवकर, गुरुनाथ पिंगळे, गणपत गाढवे राजकुमार स्वामी, तानाजी इंगळे नागेश निगडे, संतोष नागणे भारत निकम कृष्णा निकम, यांच्यासह कामगार प्रतिनिधी कर्मचारी सरपंच पत्रकार ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**प्रत्यक्ष अनुभवली वृत्तसंकलनाची इनसाईड स्टोरी; ७५ पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी**

# पत्रकारिता विद्यार्थ्यांनी घेतली विविध माध्यम संस्थांची क्षेत्रभेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर / प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच सोलापूर शहरातील विविध प्रतिष्ठित माध्यम संस्था, शासकीय माहिती कार्यालय आणि श्रमिक पत्रकार संघ यांना अभ्यासपूर्ण क्षेत्रभेट दिली. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रत्यक्ष पत्रकारितेचे वास्तव, वृत्तसंकलनातील आव्हाने, डिजिटल युगातील बदलत जाणारे माध्यम स्वरूप आणि पत्रकारांच्या सामाजिक जबाबदार्‍या जवळून अनुभविण्याची संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांना मिळाली.






सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे आणि जनसंज्ञापन विभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या यशस्वी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात एम.ए. जनसंज्ञापन आणि बी.ए. मीडिया अँड मास कम्युनिकेशन या दोन्ही अभ्यासक्रमांचे मिळून एकूण ७५ पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना बातमी कशी शोधली जाते, ती कशी संकलित केली जाते, तिचे संपादन कसे होते आणि वृत्तसंस्थेच्या तांत्रिक व संपादकीय अडचणींवर मात कशी केली जाते, हे प्रत्यक्ष पाहाता यावे, हा या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश होता. विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला होता.

विद्यार्थ्यांच्या क्षेत्रभेटीची सुरुवात सोलापूर श्रमिक पत्रकार संघ येथून झाली. पत्रकारिता करताना पत्रकारांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, त्यांच्या हक्कांचे रक्षण कसे होते आणि व्यावसायिक सुरक्षितता कशी जपली जाते, यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे आणि खजिनदार किरण बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शासकीय पातळीवर पत्रकारांशी समन्वय साधणारे सर्वात महत्त्वाचे केंद्र म्हणजे ‘जिल्हा माहिती कार्यालय’. विद्यार्थ्यांनी या कार्यालयाला भेट देऊन शासकीय प्रसिद्धी यंत्रणेचे कामकाज कसे चालते, याची सखोल माहिती घेतली. जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महाविभागाची संपूर्ण रचना, धोरणे आणि जबाबदार्‍या स्पष्ट केल्या. सोनटक्के यांनी सांगितले की, शासनाच्या कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम माहिती कार्यालय करते. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून शासनाचे निर्णय जनतेपर्यंत कसे पोहचवले जातात, प्रेस नोट कशी तयार केली जाते आणि संकटकाळात शासकीय भूमिका कशी असते, याचे धडे त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. सरकारी पातळीवरील जनसंपर्क कसा हाताळला जातो, याची व्यावहारिक जोड विद्यार्थ्यांना येथे मिळाली.

पत्रकारितेला केवळ राजकारण आणि गुन्हेगारी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक घडामोडींचे वृत्तांकण कसे करावे, हे शिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सोलापूरच्या आराध्य दैवत श्री सिद्धेश्वर मंदिराला भेट दिली. तसेच दैनिक सकाळ मध्ये संपादक संभाजी पाटील आणि कार्यकारी संपादक सिध्दाराम पाटील, दैनिक तरुण भारत संपादत प्रशांत माने आणि इन सोलापूर न्यूज संपादक समाधान वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या जनसंज्ञापन विभागातील एम.ए. जनसंज्ञापन आणि बी.ए. मीडिया अँड मास कम्युनिकेशनच्या ७५ विद्यार्थ्यांनी या संपूर्ण क्षेत्रभेटीत अत्यंत शिस्तबद्ध सहभाग नोंदवला. प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांनी पत्रकारांना आणि अधिकार्‍यांना प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन केले.

या संपूर्ण क्षेत्रभेटीचे यशस्वी नियोजन जनसंज्ञापन विभागातील प्रा. डॉ. अंबादास भासके, प्रा. डॉ. तेजस्विनी कांबळे, प्रा. विठ्ठल एडके, प्रा. डॉ. मधुकर जक्कन आणि प्रा. ऋषिकेश मंडलिक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सोलापूरच्या सत्ताकारणात कल्याणशेट्टींचा 'पॉवर गेम'

# डीसीसी बँकेच्या अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडण्याची दाट शक्यता

## पक्षाच्या विस्तारासाठी बजावलेली भूमिका, राजकीय नेत्यांशी साधलेला संवाद अन् संघटनात्मक ताकदीमुळे संभाव्य निवडीकडे लागले लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात सध्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (DCC Bank) अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नावाची अध्यक्षपदासाठी जोरदार चर्चा होत असून, त्यांना ही जबाबदारी मिळण्याची दाट शक्यता असल्याचे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे. जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, विविध भागांतील राजकीय नेत्यांशी साधलेला समन्वय आणि पक्षाच्या विस्तारासाठी बजावलेली भूमिका या बाबींच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या संभाव्य निवडीकडे लक्ष लागले आहे.




आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची राजकीय वाटचाल आता केवळ अक्कलकोट मतदारसंघापुरती मर्यादित न राहता जिल्हास्तरीय राजकीय समीकरणांशी जोडली जात असल्याचे चित्र आहे. सोलापूर शहरासह मोहोळ, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि जिल्ह्यातील इतर भागांत भाजपची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी त्यांनी केलेल्या राजकीय हालचालींची चर्चा होत आहे. विविध राजकीय पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांना, माजी आमदारांना आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांना भाजपच्या प्रवाहात आणण्याच्या प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची राहिल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते.पक्षाचा विस्तार, स्थानिक नेत्यांशी समन्वय आणि कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे प्रयत्न यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात त्यांच्या भूमिकेकडे अधिक लक्ष दिले जात आहे.

राजकारणात एखाद्या नेत्याचा प्रभाव केवळ त्याच्या मतदारसंघातील विजयापुरता मर्यादित नसतो.जिल्ह्यातील विविध भागांतील राजकीय परिस्थिती समजून घेणे, वेगवेगळ्या गटांशी संवाद ठेवणे आणि पक्षाच्या संघटनात्मक वाढीसाठी काम करणे या बाबींनाही महत्त्व असते.या दृष्टीने कल्याणशेट्टी यांच्या राजकीय कार्यपद्धतीचा विचार केला जात आहे.जिल्ह्यात भाजपची ताकद वाढवण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा विचार वरिष्ठ नेतृत्वाकडून केला जात असल्यास, ऊउउ बँकेसारख्या महत्त्वाच्या संस्थेच्या अध्यक्षपदासाठी त्यांच्या नावाचा विचार होण्यामागील राजकीय संदर्भ स्पष्ट होऊ शकतो...

**वरिष्ठ नेतृत्वाचा हिरवा कंदील मिळणार?**

DCC बँकेच्या अध्यक्षपदाची निवड ही केवळ एका पदापुरती मर्यादित नसून जिल्ह्यातील राजकीय आणि सहकार क्षेत्रातील समीकरणांवर परिणाम करणारी ठरू शकते.त्यामुळे या निवडीत जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांची भूमिका, वरिष्ठ नेतृत्वाचे मार्गदर्शन, संचालकांचे पाठबळ आणि विविध गटांमधील समन्वय महत्त्वाचा राहणार आहे.कल्याणशेट्टी यांच्या नावाला स्थानिक नेतृत्वाकडून आणि वरिष्ठ पातळीवरून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यास त्यांच्या अध्यक्षपदाच्या दाव्याला बळ मिळू शकते.सध्याच्या चर्चेनुसार त्यांच्या नावाला संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**बिनविरोध निवडीची शक्यताही चर्चेत**

DCC बँकेच्या निवडणुकीत विविध राजकीय गटांमध्ये सहमती निर्माण झाली,तर अध्यक्षपदाची निवड बिनविरोध होण्याचा मार्ग खुला होऊ शकतो.कल्याणशेट्टी यांच्या नावावर प्रमुख नेत्यांमध्ये एकमत झाले आणि संचालकांचे आवश्यक समर्थन मिळाले,तर त्यांच्या निवडीचा मार्ग सुकर होऊ शकतो,अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. मात्र, बिनविरोध निवडीचे चित्र स्पष्ट होण्यासाठी संबंधित संचालकांची भूमिका,उमेदवारी आणि निवडप्रक्रियेतील अधिकृत घडामोडी महत्त्वाच्या ठरणार आहेत...

**अक्कलकोटच्या नेतृत्वाला जिल्हास्तरावर मोठी संधी?**

अक्कलकोट तालुक्यासाठी ही संभाव्य घडामोड महत्त्वाची मानली जात आहे.स्थानिक राजकारणात सक्रिय असलेल्या नेतृत्वाला जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात महत्त्वाची जबाबदारी मिळाल्यास तालुक्याच्या राजकीय स्थानाला नवे परिमाण मिळू शकते.सहकार क्षेत्राचा ग्रामीण अर्थव्यवस्थेशी, शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजांशी आणि विविध सहकारी संस्थांच्या कामकाजाशी थेट संबंध असल्याने या पदाला विशेष महत्त्व आहे.त्यामुळे सचिन कल्याणशेट्टी यांच्या नावाची अध्यक्षपदासाठी चर्चा ही अक्कलकोटपुरती मर्यादित न राहता संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण करणारी ठरत आहे...

अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यास कृषी कर्जपुरवठा, ग्रामीण भागातील आर्थिक गरजा, सहकारी संस्थांचे कामकाज आणि बँकेच्या कारभारातील पारदर्शकता यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याची अपेक्षा राहील.मात्र,या जबाबदारीचे यश बँकेची आर्थिक स्थिती, संचालक मंडळाचे निर्णय, सहकार क्षेत्रातील अनुभव आणि नियामक चौकटीचे पालन यांवरही अवलंबून असेल. त्यामुळे राजकीय प्रभावासोबतच संस्थात्मक कामकाजाची समज आणि सर्वसमावेशक निर्णयप्रक्रिया यांनाही महत्त्व प्राप्त होईल.

सोलापूर जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये कल्याणशेट्टी यांची भूमिका,स्थानिक नेतृत्वाशी असलेला समन्वय आणि वरिष्ठ नेत्यांशी असलेले राजकीय संबंध या बाबी त्यांच्या संभाव्य निवडीच्या चर्चेत महत्त्वाच्या ठरत आहेत.या सर्व समीकरणांचा विचार करता ऊउउ बँकेच्या अध्यक्षपदासाठी त्यांच्या नावाची चर्चा अधिक लक्षवेधी झाली आहे. राजकीय परिस्थिती अनुकूल राहिली आणि आवश्यक पाठबळ मिळाले, तर त्यांच्या नावावर सहमती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही...

एकंदरीत, DCC बँकेच्या अध्यक्षपदासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नावाची चर्चा आणि त्यांना संधी मिळण्याची व्यक्त केली जात असलेली दाट शक्यता,यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात उत्सुकता वाढली आहे.जिल्ह्यात भाजपचा विस्तार,प्रमुख नेत्यांमधील समन्वय आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्वाची निवड या तिन्ही बाबींचा या घडामोडींशी संबंध जोडला जात आहे.अक्कलकोटमधून जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नेतृत्वाची नवी संधी निर्माण होणार का, वरिष्ठ नेतृत्व त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करणार का आणि बिनविरोध निवडीचा मार्ग खुला होणार का,याचे उत्तर आगामी घडामोडींमधून स्पष्ट होईल.

– सतीश पालापुरे । अक्कलकोट

---

# नवरात्र महोत्सव २०२६ – श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान



- **मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सर्व सदस्य महोदय, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवाची तयारी पूर्ण**
- **पारंपारिक कार्यक्रमांसह महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री विठ्ठलास देखील नेहमी प्रमाणे सोने मुकुट, कौस्तुक मणी, मोत्याचा तुरा, नाम, दंडपेठ्या मोठा जोड, हि-यांचा कंगण जोड, एक पदरी मोत्याची कंठी, लहान-मोठा शिरपेच, मत्सजोड, मारवाडी पेठ्यांचा मोत्याचा हार इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे श्री. विठ्ठल व रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. सदरचे अलंकार पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. तसेच सभामंडपातील पारंपारिक कार्यक्रमा शिवाय महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण झालेले आहे. नवरात्र उत्सवातील भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिरात पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले

---

# कळंब ग्रामदैवत अंबाबाई देवी मंदिरात घटस्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे – नवसाला पावणारी ग्रामदेवता म्हणून प्रसिद्ध असलेल्या अंबाबाई देवीच्या नवरात्र महोत्सवाला घटस्थापनेने सुरुवात झाली. नवरात्राचे दहा दिवस येथे भक्तांची मांदियाळी असते. कळंब शहरातील परंतु कामानिमित्त बाहेरगावी स्थायिक झालेले भाविक मोठ्या संख्येने दर्शनास येतात. अंबाबाई देवी नवसाला पावणारी असल्याची भक्तांची तसेच शहरवासीयांची श्रद्धा आहे. अंबाबाई (देवी) मंदिर हे कळंब शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखले जाते. दरवर्षी नवरात्र ते कोजागरी पौर्णिमा या कालावधीत येथे यात्रेसमान गर्दी असते.

नवरात्र उत्सव काळात मंदिर व परिसर सजवला जातो. सकाळी चार वाजल्यापासून भाविक दर्शनासाठी येतात. सकाळची काकड आरती व संध्याकाळची शेजारती तसेच नवरात्रिच्या नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. मंदिर परिसरामध्ये पूजेच्या साहित्याची व प्रसादाची दुकाने लागतात व या परिसराला यात्रेचे स्वरूप असते. मंदिर परिसरात भाविकांच्या सोयी सुविधांसाठी मंदिर समिती बरोबर नगरपालिका कार्यरत असते. नवरात्र महोत्सव यशस्वी करण्यासाठी शहरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अंबाबाई (देवी) मंदिर हे कळंब शहराचे ग्रामदैवत म्हणून पंचक्रोशीत ओळखले जाते. कळंबचे ग्रामदैवत अंबाबाई देवी मंदिर पुरातन मंदिर असून पूर्वी चुना मातीत बांधलेले होते. काही वर्षांपूर्वी भाविकांच्या योगदानाने मंदिराचा जिर्णोद्धार झाला आहे. मोठ्या संख्येने भाविक भक्त मंदिरात नवस फेडण्यासाठी येतात.



---

# श्री क्षेत्र पंढरपूर येथे १२ ऑक्टोबरपासून रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सवाला प्रारंभ

**शास्त्रीय गायन, अभंगवाणी, व्याख्यान आणि भरतनाट्यमची पर्वणी; १८ ऑक्टोबरपर्यंत विविध सांगीतिक कार्यक्रमांचे आयोजन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, सोमवार, दि. १२ ऑक्टोबरपासून या महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. दि. १२ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत श्री संत तुकाराम भवन येथे दोन सत्रांत विविध सांगीतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. सायंकाळी ५.३० ते ७ आणि रात्री ७.३० ते १० या वेळेत होणाऱ्या या महोत्सवात नामवंत शास्त्रीय गायक, अभंगगायक, युवा कलाकार तसेच नृत्यकलाकार आपली कला विठुरायाच्या चरणी समर्पित करणार आहेत. मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर व सर्व सन्माननीय सदस्य, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव आणि व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी कृष्णा लवेकर यांचे शास्त्रीय गायन व अभंग आणि ज्योती शाम गोराने यांची अभंगवाणी सादर होणार आहे. मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी देवश्री दंडवते यांचे गायन आणि 'आयडिया सारेगमप' विजेती ज्ञानेश्वरी गाडगे यांचा 'स्वर ज्ञानेश्वरी' हा कार्यक्रम होईल. बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी प्रा. मधुकर पाटील यांचे 'संत साहित्याची परंपरा आणि वारकरी संप्रदाय' या विषयावर व्याख्यान, तसेच पं. कुमार गंधर्व यांचे नातू व शिष्य पं. भुवनेश कोमकली यांचे शास्त्रीय गायन आणि सगुण-निर्गुण अभंग सादर होतील. गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी रोहित पुजारी यांचे गायन आणि चैतन्य देवढे (माऊली, आळंदी) यांचा 'स्वर चैतन्य' कार्यक्रम होईल. शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी चैतन्य देशपांडे यांची अभंगवाणी आणि पं. शौनक अभिषेकी यांचे शास्त्रीय गायन व अभंगांचा 'स्वराभिषेक' अनुभवता येईल.

शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी पं. राम विधाते व पं. बजरंग विधाते यांची अभंगवाणी, तर पं. शंकर विधाते यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता 'नवरस नृत्यांजली' या भरतनाट्यम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ७.३० वाजता लक्ष्मी बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'शक्ती जागर' या भरतनाट्यम सादरीकरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने शास्त्रीय संगीत, अभंगवाणी आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी हा संगीत महोत्सव सातत्याने आयोजित केला जातो. या उपक्रमामुळे नामवंत कलाकारांसोबतच विविध कलाप्रकारांना व्यासपीठ उपलब्ध होत असून, पंढरपूरच्या सांस्कृतिक वैभवात भर पडत आहे. या महोत्सवातील सर्व कार्यक्रमांचा पंढरपूर व पंचक्रोशीतील कलारसिक आणि संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




---

## कल्याणमध्ये जागर महामानवांचा महानाट्याचा विशेष कार्यक्रम

## रथाच्या निर्मितीसाठी मदतनिधी उभारण्याचे आवाहन

# शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या प्रचारासाठी धम्म प्रचार रथ उभारणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचे साहित्य लोकांपर्यंत आधुनिक साधनांनी पोहोचविण्यासाठी नागसेन बुक डेपोच्या संकल्पनेतून अत्याधुनिक डएऊ युक्त असा धम्म प्रचार रथ अर्थात ज्ञानरथ साकारण्यात येत आहे. या रथाच्या निर्मितीसाठी मदतनिधी उभारण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या उपक्रमाची माहिती देण्यासाठी आणि मदतनिधीसाठी मा. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जागर महामानवांचा – एक संगीतमय महानाट्य

नागसेन बुक डेपो आणि पद्मा-सीमा-जॉली निर्मित, थश ींहश झशेश्रिश झीशीशपींी – जागर महामानवांचा एक संगीतमय महानाट्य (६० कलाकारांसोबत) चे आयोजन करण्यात आले आहे.

या महानाट्यात भारतीय महिला शाहीर मा. सिमा पाटील आणि संगीत, दिग्दर्शक, निर्माता मा. जॉली मोरे (संगीत – जॉली मोरे । निर्मिती – पद्मा-सीमा-जॉली, लेखक-दिग्दर्शक – जॉली मोरे) यांचा समावेश असणार आहे.

Mission धम्म रथ... ची संकल्पना काय?

चळीीळेप धम्म रथच्या माध्यमातून सर्व बुद्धिजीवी धम्मबांधवांना विनम्र आवाहन करण्यात आले आहे. या ज्ञानरथाच्या माध्यमातून गाव-शहरातील जनसामान्यांपर्यंत आधुनिक पद्धतीने भगवान बुद्ध, शिवराय, ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व ग्रंथसाहित्य, भिक्खू संघाची धम्मदेसना व प्रबोधन, तसेच बहुजन तरुणांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर मार्गदर्शन व जनजागृती करण्याचा मानस आहे.

या संपूर्ण ज्ञानरथासाठी अपेक्षित खर्च : ३०,००,०००/- लाख रुपये आहे.

मदतीचे आवाहन –

प्रत्येकाने दररोज १/- रुपया याप्रमाणे वर्षाला ३६५/- रुपये योगदान दिल्यास हा ज्ञानरथ साकार होण्यास मोठी मदत होईल, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अर्थसहाय्यासाठी : सोमनाथ भोसले – ग्रेस्रश्रश झरू : ९३२२७४१६०९

विशेष उपक्रम कधी आणि कुठे?

धम्म प्रचार रथाच्या अर्थसहाय्य उभारणीकरिता विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे –

दिनांक : १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११:०० ते १४:३० वाजेपर्यंत

स्थळ : आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमंदिर, शंकरराव चौक, सुभाष मैदान, कल्याण (पश्चिम)

कार्यक्रम : WE THE PEOPLE Presents जागर महामानवांचा – शाहीर सीमा ताई पाटील व जॉली मोरे यांचे संगीतमय महानाट्य

तिकीट दर : १,००० । २,००० । ५,००० रुपये

आज एका ज्ञानरथाला हातभार लावल्यास... उद्या असंख्य ज्ञानरथांची चळवळ उभी राहील. करिता या सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमास यथाशक्ती सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.